**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार, दिनांक १६ एप्रिल २०२४**

**ठळक बातम्या**

- **पहिल्या टप्याच्या निवडणुकीचा प्रचार शिगेला: उद्या संध्याकाळी प्रचार तोफा थंडावणार.**
- **अनधिकृत लेआऊटचं बांग्लादेश पॅटर्ननं नियमितीकरण करणार- नितीन गडकरी यांचं आश्वासन, तर शासकीय कार्यालयातील रिक्त पदं भरणार - विकास ठाकरे यांची ग्वाही.**
- **गडचिरोलीतील संवेदनशील ६८ मतदान केंद्रांवर २९५ मतदान अधिकारी हवाई मार्गानं रवाना.**
- **विदर्भात कमाल तपमानात वाढ; आगामी काही तासात नागपूर, गोंदिया आणि भंडारा जिल्हयांमध्ये गारपीट होण्याची शक्यता.**

*****

प्रचार शिगेला

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याच्या मतदानाचा दिवस जसजसा जवळ येत आहे, तसतसा प्रचार शिगेला पोहोचला आहे. उद्या संध्याकाळी 6 वाजता प्रचार तोफा थंडावणार आहेत. या टप्प्यात १७ राज्यातल्या १०२ लोकसभा मतदारसंघात मतदान होणार आहे. यात पूर्व विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्हयांचा समावेश असून इथं येत्या १९ तारखेला मतदान होणार आहे. सकाळी ७ ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान करता येणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज रामटेकमध्ये राजू पारवे यांच्या प्रचारार्थ रोड शो मध्ये सहभागी होतील. उपमुख्यमंत्री आणि भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांची टी.बी.हॉस्पीटल ग्राउंड, गोंदिया इथं नुकतीच सभा पार पडली. गोंदियापर्यंत समृद्धी महामार्ग आणणार असून, आचारसंहितेनंतर गोंदिया शहरातील कचऱ्याचा प्रश्न देखील आम्ही मार्गी लावू, असं आश्वासन फडणवीस यांनी या सभेत दिलं. मागील १० वर्षात मोदींनी गरीब

कल्याणाचं धोरण यशस्वी केल्याचं फडणवीस यांनी आवर्जून सांगतानाच भाजपा उमेदवार सुनील मेंढे यांना निवडून देण्याचं आवाहन उपस्थितांना केलं.दरम्यान, आज फडणवीस नागपुरातील शितला माता मंदिर चौक, डिप्टी सिग्नल, आणि गुजरवाडी चौक इथं जाहीर सभांना संबोधित करतील.प्रचार सभांव्यतिरिक्त बूथस्तरावरचं नियोजन आणि समाजमध्यमावरील मोहिमा देखील अंतिम टप्प्यात आहेत.

गडकरी संकल्प पत्र

भाजपचे नागपूरचे उमेदवार आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज आपल्या निवडणूक पूर्व वचननाम्याचं नागपुरात पत्रकार परिषदेत प्रकाशन केलं. नागपुरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत लेआऊटची समस्या असून भारत-पाकिस्तान युद्ध झाल्यावर अनेक बंगलादेशी शरणार्थी नाईक तलाव परिसरात वास्तव्याला आले. त्या जागेवर केंद्र आणि राज्य सरकारच्या मदतीनं मालकी हक्क आणि नियमितीकरण करून किमान किमतीत ही प्रक्रिया करण्यात येत आहे. अशाच प्रकारे अन्य ठिकाणच्या समस्या देखील सोडविल्या जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. नागपुरात 6-7 लाख लोक अनधिकृत ठिकाणी राहतात. सोयींअभावी स्वच्छ नागपूर ही संकल्पना अंमलात येऊ शकत नाही. त्यामुळं अनधिकृत लेआऊटचं बांग्लादेश पॅटर्ननं नियमितीकरण करण्यात येईल, असं गडकरी म्हणाले. या शिवाय नागपूरच्या विकासाच्या दृष्टीनं समाजातील विविध घटकांकडून मिळालेल्या सूचनांचा अंतर्भाव वचननाम्यात केला असल्याचं त्यांनी सांगितलं.

विकास ठाकरे

नागपूर शहरातील महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यास आणि मेट्रो सारख्या अनेक सरकारी संस्थांमध्ये कंत्राटीपद्धतीनं काम सुरू आहे. याचा लाभ काही विशिष्ट कंत्राटदारांना होत आहे. या उलट इथं काम करणाऱ्या तरुणांना शैक्षणिक योग्यतेनुसार सन्मानजक वेतन दिलं जात नाही. यावर उपाय म्हणून काँग्रेसच्या पाच न्यायापैकी युवा न्याय अंतर्गत शासकीय कार्यालयातील रिकामी असलेली पदं भरणार आणि कंत्राटी पद्धत बंद करून तरुणांना सरकारी नोकरी मिळेल,

असं  आश्वासन इंडिया आघाडीतील भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अधिकृत उमेदवार विकास ठाकरे यांनी दिलं. काल  पूर्व नागपुरात आयोजित जन आशीर्वाद यात्रेत तरुणांनी रोजगाराबद्दल विचारलेल्या प्रश्नावर ते बोलत होते.‘शहरात मिहानसह अनेक मोठे प्रकल्प, केंद्र आणि राज्य सरकारची  कार्यालयं  असताना नागपुरातील तरुणांना रोजगारासाठी मुंबई, पुणे, बंगळुरू, हैद्राबाद गाठावं लागत आहे. त्यामुळं नागपुरातील नोकरभरतीत स्थानिकांना प्राधान्य देण्यात येईल आणि त्यासाठी मतदारांनी इंडिया आघाडी सोबत येणं महत्वाचं आहे, असंही ठाकरे म्हणाले.

सदिच्छादूत

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा, या हेतूनं मतदान हक्काचं महत्त्व सांगण्यासाठी निवडणूक आयोगाच्या वतीनं मतदारजागृतीचे विविध उपक्रम राबविले जात आहेत. मतदार जागृतीच्या या उपक्रमांना आता कला, क्रीडा, साहित्य आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची ‘सदिच्छादूत’ म्हणून साथ लाभली आहे. पहिल्यांदाच राज्यस्तरीय आणि जिल्हानिहाय सदिच्छादूत मतदारांना मतदानाचं महत्व समजावून देण्यासाठी आवाहन  करीत आहेत. समाज माध्यमं, मुद्रित माध्यमं आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांबरोबरच जाहिरातफलक, भित्तीपत्रकाद्वारे हे सदिच्छादूत लोकशाही सुदृढ करण्यासाठी मतदान करण्याचं  आवाहन करीत आहेत. गडचिरोलीमध्ये पद्मश्री डॉ. परशुराम खुणे, गोंदियामध्ये मुन्नालाल यादव, नागपूरसाठी जयंत दुबळे आणि ज्योती आमगे; वर्ध्यात निमिश मुळ्ये, यवतमाळमध्ये अंकुर वाढवे, आकाश चिकटे, तर चंद्रपूरमध्ये शेख गायसुद्दिन सदिच्छादूत म्हणून काम करणार आहेत.

यूपीएससी निकाल

यूपीएससीद्वारे घेण्यात आलेल्या  नागरी सेवा परीक्षा २०२३ चा निकाल आयोगानं आज घोषित केला. त्यात आदित्य श्रीवास्तव पहिला, अनिमेष प्रधान दुसरा, तर दोनुरु अनन्या रेड्डी तिसऱ्या क्रमाकांवर आहे. या परीक्षेला ६ लाखापेक्षा जास्त उमेदवार बसले होते. आयोगानं एकूण १ हजार १६ उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस केली आहे. त्यात ३५२ मुलींचा समावेश आहे. दोनुरू अनन्या रेड्डी ही

मुलींमधून अव्वल स्थानी असून तिने क्रमवारीत तिसरं स्थान पटकावलं आहे. यंदा पहिल्या १० उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये ५ मुलींनी बाजी मारली आहे.  यावर्षी नागपूर आणि विदर्भातील उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे. यंदा नागपूरमधून चार विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत, तर नागरी सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्राच्या पाच विद्यार्थ्यांनी बाजी मारली आहे. नागपूरमधून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमध्ये सुरेश बोरकर, मयुरी महल्ले, प्रांजली खांडेकर, शुभम डोंगरदिवे, राजेश्री देशमुख, शुभम पवार,  चिन्मय बन्सोड, अपूर्व बालपांडे यांचा समावेश आहे. उत्तीर्ण झालेल्या एकूण उमेदवारांमध्ये ३४७ उमेदवार खुल्या प्रवर्गाचे, ११६ उमेदवार आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचे, ३०३ उमेदवार ओबीसी प्रवर्गाचे, १६५ उमेदवार अनुसूचित जाती प्रवर्गाचे तर ८६ उमेदवार अनुसूचित जमाती प्रवर्गाचे आहेत.

अतिसंवेदनशील मतदान केंद्र

येत्या १९ एप्रिलला होणाऱ्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदार संघातील संवेदनशील आणि अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर मतदान पथकं रवाना करण्यास आज सुरुवात झाली. गडचिरोलीतील विविध संवेदनशील आणि अतिसंवेदनशील अशा ६८ मतदान केंद्रांवरील ७२ निवडणूक पथकांच्या २९५ मतदान अधिकारी आणि  कर्मचाऱ्यांना ईव्हीएम आणि इतर युनिट्सना आज सकाळी भारतीय वायुसेना आणि भारतीय लष्कराच्या ३-एम.आय-१७ आणि ४-ए.एल.एच. हेलिकॉप्टरच्या मदतीनं बेसकॅम्पवर सुरक्षितपणे पोहचवण्यात आलं. गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदार संघात एकूण सहा विधानसभा क्षेत्रांचा समावेश होतो. यातील अहेरी विधानसभा क्षेत्र अतिसंवेदनशील आणि नक्षलग्रस्त म्हणून ओळखलं जातं. या क्षेत्रात मुलचेरा, एटापल्ली, भामरागड, अहेरी आणि सिरोंचा या पाच तालुक्यांचा समावेश आहे. याठिकाणी जिल्हा पोलिस अधीक्षक निलोत्पल यांच्या मार्गदर्शनात निवडणूक पथकांना सुरक्षितपणे पोहचविण्यास सुरुवात झाली आहे.

गृह मतदान

यवतमाळ - वाशिम लोकसभा मतदारसंघात येत्या २६ एप्रिलला मतदान होणार असलं, तरीही दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांचं गृह मतदान घेण्यास सुरुवात झाली आहे. वयाची ८५ वर्षे पूर्ण करणाऱ्या पुसद इथल्या गंगादेवी कान्हू यांनी काल मतदानाचा हक्क बजावला. अशाच पद्धतीनं जिल्ह्यातल्या ५३ हजार ज्येष्ठ नागरिकांचं गृह मतदान घेण्यात येणार आहे.

रामनवमी

रामनवमी उद्या साजरी होणार आहे. नागपुरातील सेंट्रल एव्हेन्यू मार्गावरील पोद्दारेश्वर राम मंदिरातर्फे दरवर्षीप्रमाणं यंदाही शोभायात्रा आयोजित करण्यात आली आहे. शोभायात्रेचं हे ५८ वं वर्ष आहे. संपूर्ण विदर्भात प्रसिद्ध असलेल्या या भव्य सोहळ्यात शंखनाद, तांडव नृत्यासह चित्ररथांचा समावेश असणार आहे, अशी माहिती पुनित पोद्दार यांनी पत्रपरिषदेत दिली. शोभायात्रेला उद्या दुपारी ४ वाजता सुरुवात होईल. मुख्य सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून पंजाबचे राज्यपाल बनवारीलाल पुरोहित, रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत आदींची उपस्थिती राहील.

आरटीई

२०२४-२५ या आगामी शैक्षणिक वर्षात शिक्षण हक्क अधिनियम - आरटीई अंतर्गत दुर्बल, वंचित, शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागासवर्ग घटकाकरता ऑनलाईन अर्ज भरण्यास आजपासून सुरुवात झाली. शिक्षण संचालनालयानं याबाबतचं परिपत्रक जारी केलं असून संबंधित पालकांना येत्या ३० तारखेपर्यंत अर्ज भरता येतील.

आयपीएल

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज कोलकता नाईट रायडर्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सामना होणार आहे. कोलकत्यामध्ये रात्री साडे ७ वाजता ईडन गार्डनवर हा सामना सुरू होईल. बेंगळुरूमध्ये काल झालेल्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादनं रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूचा २५ धावांनी पराभव केला.

हवामान

देशाच्या  मध्य आणि पूर्व भागात तसंच महाराष्ट्रात येत्या ३-४ दिवसांत  कमाल तापमानात ३  ते ४ अंशांनी वाढ  होईल, असं अंदाज हवामान खात्यानं व्यक्त केला आहे. विदर्भात अवकाळी पावसानंतर आता कमाल तापमानात वाढ होत आहे. मागील २४ तासात सर्वाधिक कमाल तापमान अकोला इथं ४१ अंश सेल्सियस इतकं नोंदविण्यात आलं. नागपुरात देखील कमाल तापमान जवळ जवळ ३८ अंश सेल्सियस इतकं नोंदविण्यात आलं. याशिवाय हवामान विभागानं आगामी निवडणूक काळात उष्णतेची लाट येण्याची शक्यता वर्तवली असून लोकांनी उन्हापासून बचाव करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. दरम्यान, नागपुरात आज तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे, तर अकोला, अमरावती, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यात आज सर्वत्र पावसाची शक्यता आहे. आगामी काही तासात विदर्भातील अकोला, अमरावती, नागपूर, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ, वर्धा, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. नागपूर, गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी गारपीट होण्याची देखील शक्यता आहे.

******